# प्रेस नोट

**‘‘ पोलीस असल्याची बतावणी करून त्यांची लुट करणाऱ्या सऱ्हाईत आरोपींना अटक केलेबाबत...’’**

दिनांक ०८/०९/२४ रोजी सकाळी ०७:०० वा सुमारास खार पोलीस ठाणे हद्दीतील कॅनरा बॅक, बॉम्बे सॅलॅड शेजारी, १६ वा रोड खार (प.) मुंबई येथे दाखल गुन्हयातील फिर्यादी हे कॅश डिपॉझीट मशीनमध्ये रक्कम भरण्यासाठी गेले होते व काही रक्कम डिपॉझीट करून ते बाहेर येत असताना अचानक दोन इसम ए.टी एम मशीनच्या गेटवर आले व त्यांनी फिर्यादी यांस ‘‘आम्ही क्राईम ब्रॅंच मधून आलो आहे. तुम्हाला चौकशी कामी क्राईम ब्रॅंच येथे घेवून जात आहोत असे सांगुन फिर्यादी यांस पांढऱ्या रंगाची कारमध्ये बसविले. त्यानंतर त्यांनी फिर्यादी यांचेकडे असलेली पैशांची बॅग तपासुन, तुम्हारे पास ये पैसा कहांसे आया है ! अशी विचारणा केली. फिर्यादी यांनी त्यांना सदर रक्कम मनी ट्रान्सफरची असल्याचे सांगीतले. त्यावर ते फिर्यादीस गाडी मधुन बराच वेळ फिरवुन शेवटी एस व्ही रोड, सांताक्रुझ प, मुंबई येथे आणुन सोडले. त्यापैकी एका इसमाने फिर्यादीस सांगतिले की, ‘‘आम्हाला अजुन दोन ते तीन जणांना पकडायचे आहे. आम्ही घाईत आहोत. असे बोलून फिर्यादीस रस्त्यावर सोडून निघून गेले. सदरवेळी त्यांनी फिर्यादीकडे असलेली ५,००,०००/-रु रोख रक्कम असलेली निळया रंगाची आडवी बॅग घेऊन गेले म्हणुन फिर्यादी यांनी खार पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिली असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन खार पोलीस ठाणे, गु.र.क्र. ८४४/२०२४ कलम २०४,३१८(४),३१९(२), ३(५) भारतीय न्याय.संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयाच्या घटनास्थळ व जवळपासच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासणी, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने इसम नामे संदेश दत्ताराम मालाडकर, वय ५१ वर्षे यास आचरा जि सिंधुदुर्ग येथुन मोटार सायकलसह ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणुन त्याचा सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. तसेच नमुद गुन्हयातील उर्वरित ०४ आरोपीतांना अंधेरी येथील हॉटेलमधुन पोलीस पथकाने ताब्यात घेवुन त्यांना नमुद गुन्हयात अटक केलेली आहे.

**अटक आरोपीतांचा तपशिल :-**

१) संदेश दत्ताराम मालाडकर , वय ५१ वर्षे
२) प्रफुल्ल शंकर मोरे हिं वय ४६ वर्षे,
३) विकास श्रीधर सुर्वे हिं वय ३९ वर्षे,
४) चेतन केम्पे गौडा हिं वय ३४ वर्षे,
५)दर्शन महेश यागनिक हिं वय ४३ वर्षे,

**आरोपी क्रमांक १) संदेश दत्ताराम मालाडकर** , वय ५१ वर्षे याचा गुन्हे अभिलेख
१) भोईवाडा पोलीस ठाणे गु.र.क्र ३८/२०१६ कलम ३७९ भादवि
२) रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.क्र १५१/२०१६ कलम ३७९ भादवि
३) मनपाडा पोलीस ठाणे गु.र.क्र ०६/२०१७ कलम ३७९ भादवि
४) सीबीडी बेलापुर पोलीस ठाणे गु.र.क्र ५२/२०१६ कलम ३७९ भादवि
५) खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.क्र ११८/२०१७ कलम ३७९ भादवि
६) मालाड पोलीस ठाणे गु.र.क्र १९८/२०१९ कलम ३८४, १७०,५०६, ५०४ भादवि
७) दहिसर पोलीस ठाणे गु.र.क्र ३१५/२०२४ कलम १७०,३२३,३६५,५०४,५०६ भादवि
८) नवघर पोलीस ठाणे गु.र.क्र २५१/२०२२ कलम ४२०, १७०,५११, ३४ भादवि

**आरोपी क्रमांक :-** २) प्रफुल्ल शंकर मोरे हिं वय ४६ वर्षे, याचा गुन्हे अभिलेख
१) मीरा रोड पोलीस ठाणे गु.र.क्र २२३/२०१६ कलम ४२०, ४६५,४६७,४७१,३४ भादवि.
२) दहिसर पोलीस ठाणे गु.र.क्र ३१५/२०२४ कलम १७०,३२३,३६५,५०४,५०६ भादवि

उपरोक्त नमूद आरोपीतांना अटक करून त्यांच्याकडुन एकुण ३,३०,०००/-रूपये रोख रक्कम व नमुद गुन्हयात वापरलेली मोटार सायकल हस्तगत करण्यात आलेली आहे. नमुद अटक आरोपीतांना मा. न्यायालयाने दि. १८/०९/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे. नमुद गुन्हयातील अटक आरोपीतांनी बृहन्मुंबई व मुंबईच्या आजूबाजूच्या उपनगरातील इतर पोलीस ठाणेच्या हद्दीतही अशाच प्रकारे बतावणी करून लोकांची फसवणुक केलेली असून, त्यांच्याकडून इतर ठिकाणी देखील करण्यात आलेले गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. त्या अनुषंगाने पुढील तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त, (का व सु) श्री. सत्यनारायण, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजितसिंग दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, वांद्रे विभाग श्री. अधिकराव पोळ यांच्या कुशल समन्वायने व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खार पोलीस ठाणे, श्री. संजीव धुमाळ, पोलीस निरीक्षक गुन्हे, श्री. वैभव काटकर गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. श्री. दत्ता राम कोकणे , पो.उ. नि.श्री. संदीप गवळी व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार, स.फौ. श्री.मनोज वैद्य, पो.ह. श्री. भरत काच्चे, पो.ह.श्री. दिनेश शिर्के, पो.ह.श्री. आनंद निकम, पो.शि. श्री. विशाल जाधव, पो.शि. श्री. अजित जाधव, पो.शि. श्री. मारूती गळवे, पो.शि. श्री. मयुर जाधव, पो.शि. श्री. केदारनाथ शिंदे व पो.शि.श्री.गणेश हंचनाळे यांनी सदरची कामगिरी उत्कुष्टरित्या पार पाडली आहे.